
# प्रिंटिंगएरिया®


Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-54, Vol-02 June 2019


ISSN 2394-5303


Editor

Dr.Bapu G.Gholap



13) Importance of education in women empowerment
Manisha Bhandari ||59

14) Terracotta architecture in the temple of Coochbehar
Mr. Soumitra Deb, Bankura University ||63

15) A Study Of Structure, Style And Diction of Sylvia Plath's Poetry
Dr. B. S. Kavhar, Tq. Manora, Dist. Washim ||65

16) भारतीय संघराज्याचे संवैधानिक स्वरुप
प्रा. डॉ. नारायण दौ. बालपांडे, मोवाड ||67

17) भारतीय लोकशाही पुढील आव्हान – जात
डॉ. संगीता एस. भुयार, जि. अमरावती ||69

18) संशोधनासाठी संदर्भ साहित्यांचा उपयोग
मस्के सुर्यकांत बाबुराव, लातूर ||72

19) शिवकालीन प्रशासन व्यवस्था
डॉ. राम फुन्ने, पाथरी ||76

20) संत एकनाथाचे धर्मकार्य : एक अवलोकन
मेघा मधुकर जोशी, जि. उस्मानाबाद ||80

21) माध्यमिक शिक्षकांना वर्गव्यवस्थापनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्या दूरकरण्यासाठी उपाययोजना ...
प्रा. कातबने योगेश वसंतराव ||83

22) हिंगोली जिल्ह्यातील लोकसंख्या वितरणाचा चिकित्सक अभ्यास
किर्तीमालीनी हनमंतराव पाटील, नांदेड ||87

23) कौटिल्याचे राजकीय विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास
डॉ. संभाजी संतोष पाटील, जि. धुळे (महाराष्ट्र) ||89

24) Better Criminal Administrative System is Essential Need of Modern India
Dr. Shrinaag A. Panchbhai, Mumbai ||92

25) संतसाहित्य आणि पर्यावरणीय जाणिवांचा शोध
प्रा. ज्ञानबा गाडे, जि. बुलडाणा ||97

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

18

# संशोधनासाठी संदर्भ साहित्यांचा उपयोग

**मस्के सुर्यकांत बाबुराव**
ग्रंथपाल,
राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर

***********

प्रस्तवाना :—

ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात, संशोधन करीत असताना तुम्हांला विविध प्रकारच्या माहितीची आवश्यकता भासते. अशी माहिती तुम्हांला विविध ठिकांणापासून मिळवावी लागते. त्यासाठी तुम्ही तुमच्या विषयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या स्त्रोतांचा शोध करू लागता. असे माहिती स्त्रोत दोन प्रकारचे असतात. एक क्षेत्रीय स्त्रोत तर दुसरा लिखीत स्त्रोत. क्षेत्रीय स्त्रोतामध्ये समाजात घडणाऱ्या घटना तसेच बदलांचे प्रचलित ज्ञान असणाऱ्या व्यक्ती येतात तर लिखीत स्त्रोत हे प्रकाशित किंवा अप्रकाशित स्वरुपात उपलब्ध असणारी माहितीची साधने असतात. लिखीत स्त्रोतांचे प्राथमिक स्त्रोत, दुय्यम स्त्रोत आणि तृतियक स्त्रोत असे प्रकार पडतात. प्राथमिक स्त्रोतात जगात पहिल्यांदाच निर्माण झालेले नवी आणि ताजी माहिती मिळते. उदा. नियतकालिके, प्रबंध, प्रबंधिका, अहवाल, शासकिय प्रकाशने, प्रमाणके, पेटेन्ट व ग्रंथ इत्यादी. तर दुय्यम स्त्रोत हे प्राथमिक स्त्रोतांपासून तयार केले जातात. व त्यांच्यात दुय्यम प्रकारची माहिती मिळते. उदा. ज्ञानकोश, ग्रंथसूची, सारसंग्रह, चरित्रकोश, वार्षिके, निर्देश इत्यादी. दुय्यम स्त्रोतामध्ये प्राथमिक माहितीपर्यंत पोहचविणे बाबत मार्गदर्शन केलेले असते.

माहितीच्या या दोन स्त्रोतांपैकी संशोधनासाठी लिखीत स्त्रोतावरच तुम्हांला मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते. म्हणून माहितीच्या या लिखीत स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी तुम्हांला ग्रंथालयाकडे वळणे अपरिहार्य ठरते. कारण लिखीत साहित्य हे ग्रंथालयात उपलब्ध असते. त्यासाठी तुम्ही तुमच्या संशोधन संस्थेतील ग्रंथालयाला भेटी देऊन ग्रंथालयाचा सर्वांगीण परिचय करुन घेणे आवश्यक आहे. म्हणजे संशोधनासाठी आवश्यक ते साहित्य व संदर्भ ग्रंथामधून हवी असलेली माहिती कोणाच्याही मदतीशिवाय तुम्हाला मिळवता येईल.

**संशोधन म्हणजे :**

एखादी समस्या समोर उभी राहिल्यानंतर विशीष्ट पायऱ्यांपायऱ्यांचा वापर करुन ती सोडविणे किंवा तिथे उत्तर मिळविणे तसेच समस्येतील अनेक विविध घटकांचा परस्परसंबंध शोधून त्यातून योग्य मार्ग काढणे. एखाद्या समस्येचा सुक्ष्मतेने/बारकाईने अभ्यास करुन त्यावर मार्ग शोधणे म्हणजे आपली समस्या सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक, हेतूपर्वक शोध घेणे. यामुळे नवीन ज्ञान तयात होते. दैनंदिन जीवनातील प्रत्येक समस्या शास्त्रीय

एखाद्या विषयांतर्गत वैशिष्ट्ये जाणण्यासाठी केलेला व्यापक शोध किंवा चिकित्सा म्हणजे संशोधन होय.

वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समीक्षात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकीत्सा म्हणजे संशोधन होय.

**संशोधनासाठी ग्रंथालयाचा उपयोग :**

ग्रंथालयात ग्रंथ, नियतकालिके व इतर ज्ञानसाहित्य संग्रह केलेला असतो. हे ज्ञान साहित्य विविध विषय, व्यक्ति, संस्था व संकल्पनाची माहिती देणारे असते. यात पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ जसे शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश वार्षिके, निर्देशिका इत्यादी तसेच नियतकालीके, दुर्मिळ ग्रंथ विविध प्रकारचे साहित्य समाविष्ट असते. या ज्ञान साहित्यातूनच तुम्हांला हवे असलेले साहित्य मिळवून तुमचे संशोधनाचे काम पुर्ण करावे लागते. ग्रंथालयात वाचक उद्बोधन कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अशा कार्यक्रमांत संशोधकाने सहभागी होऊन ग्रंथालयाचा विविध विभागाची माहिती घ्यावी. यातून पुढील बाबीची जाणीव पूर्वक माहिती करुन घ्यावी.

**१. ग्रंथालय तालिका**

ग्रंथालय तालिका म्हणजे ग्रंथालयातील ग्रंथाची

यादी असते. ती कोठे ठेवतात ते पाहता येते.

**२. संदर्भ विभाग :**

संशोधनासाठी लागणारी माहिती मोठ्या प्रमाणावर संदर्भ ग्रंथातून मिळते. संशोधनासाठी उपयुक्त असा हा विभाग आहे संदर्भ म्हणजे निश्चित स्वरुपाची माहिती त्वरित आणि सहजपणे मिळावी या उद्देशाने तयार केलेले असतात. हे ग्रंथ संपुर्णपणे वाचण्यासाठी नसतात. त्यांचा वापर फक्त विशीष्ट प्रकारची माहिती किंवा संदर्भ मिळविण्यासाठीच केला जातो. संदर्भ ग्रंथातील माहितीची रचना सामान्यपणे अनुवर्णनानुसार केलेली असते. व शेवटी निर्देशही दिलेला असतो. त्यामुळे त्यांच्यातून हवी ती माहिती चटकण शोधता येते.

**संदर्भ ग्रंथाचे प्रकार :**

संदर्भ ग्रंथाचे त्यांच्यातील माहितीच्या प्रकारानुसार खालील प्रकार पडतात.

१. शब्दकोश २. ज्ञानकोश ३. चारित्र्यकोश
४. वार्षिके ५. निर्देशिका ६. निर्देशपुस्तके
७. सांख्यिकी साधने ८. स्थलवर्णन कोश
९. ग्रंथसूची १०. निर्देश आणि सारसंग्रह

संदर्भग्रंथाच्या वरील प्रकारापैकी ग्रंथसूची व निर्देश व सारसंग्रहामध्ये प्रत्यक्ष माहिती मिळत नाही. मात्र माहिती कुठे मिळू शकेल अशा साधनाची यादी

**शब्दकोश :**

कोणत्याही भाषेत केलेल्या अणुवर्णनानुसार संग्रहात शब्दकोश म्हणतात. शब्दकोशात शब्दांचा अर्थ, त्याचा उच्चार आणि स्पेलिंग लिहण्याचा वर्णानुक्रम दिलेला असतो. शब्दकोशातील शब्दांची रचना सामान्यपणे अनुवर्णनानुसार केलेले असते. परंतू, काही शब्दकोशात ती विषयानुसार असते.

**शब्दकोशाचे प्रकार :**

शब्दकोश तयार करताना प्रत्येक शब्दाची संपुर्ण माहिती संकलित केली जाते. मात्र अशी माहिती एकाच प्रकारच्या शब्दकोशात आढळत नाही. कारण काही शब्दकोशांत केवळ शब्दांचा अर्थ दिलेला असतो तर काही शब्दकोशात केवळ पर्यायी किंवा समानार्थी व विरुध्दार्थी शब्दांचाच परामर्श घेतलेला असतो. शब्दकोश कोणत्या वाचकासाठी तयार केलेला आहे. हा घटक शब्दकोशाची व्याप्ती, स्वरुप आणि प्रकार निश्चित करतो.

१. सर्व सामान्य शब्दकोश
२. विशेष शब्दकोश
३. शब्दकुल शब्दकोश
४. विषय शब्दकोश
५. अनुवादोपयोगी शब्दकोश
६. द्विभाषिक शब्दकोश
७. बहुभाषिक शब्दकोश

**संशोधनामध्ये शब्दकोशाची गरज**

१. शब्दाचा अर्थ जाणून घेण्यासाठी
२. शब्दांचा वर्णानुक्रमानुसार होणारा उच्चार
३. शब्दाचे व्याकरण
४. शब्दाचा वाक्यात उपयोग
५. शब्दापासुन तयार होणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार जाणून घेणे.
६. शब्दाला असलेले अन्य पर्यायी शब्द
७. समानार्थी व विरुध्दार्थी शब्द
८. शब्दांची व्युत्पती व इतिहास इत्यादी.

**ज्ञानकोश :**

ज्ञानकोश म्हणजे ज्ञानाचे भांडार. ज्ञानकोषात सर्व शाखांची माहिती मिळते ती लेखरुपात आसतात. प्रत्येक लेखाचा विषय स्वतंत्र आसतो. अशा सर्व लेखांची रचना अणुवर्णनानुसार केलेली असते. प्रत्येक लेखात आवश्यक त्या ठिकाणी चित्रे नकाशे व उल्लेखनीय व्यक्तींची रेखाचित्रे दिलेली असतात. लेखामधील आवश्यक ती माहिती ताबडतोड शोधता यावी म्हणून एका लेखामधुन दुसऱ्या लेखाकडे जाण्यासाठी संदर्भ दिलेले असतात. याशिवाय प्रत्येक लेखाच्या शेवटी ग्रंथसूची किंवा संदर्भसूची दिलेली असते.

**ज्ञानकोशाचे प्रकार :**

ज्ञानकोशात आढळणाऱ्या माहितीनुसार ज्ञानकोशाचे दोन प्रकार आहेत.

सर्वसाधारण ज्ञानकोश

विषय ज्ञानकोश

**सर्वसाधारण ज्ञानकोश**

सर्वसाधारण ज्ञानकोशात ज्ञानाच्या सर्व शाखा आणि उपशाखांची माहिती दिलेली असते. त्यांच्यात

सर्व विषयांची माहिती दिलेली असल्यामुळे ते सर्व समावेशक असतात. त्यामुळे कोणतयाही प्रकारची माहिती मिळविण्यासाठी सर्वसामान्य व्यक्तींकडून त्यांच्या मोठ्य प्रमाणावर उपयोग केला जातो. सर्वसाधारण ज्ञानकोशातील माहितीचे स्वरुप स्थूल असते. उदा. मराठी विश्वकोश, न्यु एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका.

**विषय ज्ञानकोश**

विषय ज्ञानकोशात केवळ विशिष्ट विषय आणि त्यांच्या उपविषयांची माहिती मिळते. त्यांच्यात मिळणारी माहिती सखोल स्वरुपाची असते. त्याचा उद्देश हा त्या त्या विषयातील तज्ञांना त्यांच्या विषयातील माहिती मिळवून देणे हा असल्यामुळे प्रत्येक विषयात तयार केलेले असतात.

**चरित्रकोश :**

संशोधन करीत असताना तुम्हांला तुमच्या क्षेत्रामधील तज्ञ व्यक्तीविषयीच्या माहितीची गरज भासू शकते. अशा वेळेस चरित्रकोश तुम्हांला उपयोगी पडतो. चरित्रकोश तुम्हांला उपयोगी पडतो.

चरित्रकोश म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या किंवा कार्य केलेल्या व्यक्तींचा वर्णानुक्रम माहिती कोश होय. चरित्रकोश हे हयात व दिवंगत व्यक्तीसाठी वेगवेगळे असतात मात्र काही चरित्रकोश मात्र हयात व दिवंगत दोन्हीही व्यक्तीची खालील माहिती देतात.

व्यक्तींचे नाव व पत्ता, व्यक्तीची शैक्षणिक माहिती, विशिष्ट व्यक्तीने केलेल्या कार्याची माहिती प्रकाशित केलेल्या ग्रंथाची माहिती, मिळालेली पारितोषिके व पदव्याची माहिती व ज्या पदावर काम केले आहे त्याची माहिती चरित्र्य कोशाची व्याप्ती राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तराबरोबर विशीष्ट विषयापुरती देखील असते.

**वार्षिके :—**

वार्षिके ही दरवर्षी प्रकाशित होतात. वार्षिकामध्ये मागील वर्षात घडलेल्या विविध क्षेत्रातील घटना आणि घडामोडींची माहिती दिलेली असते. ही माहिती थोडक्यात आणि आवश्यक तेथे आकडेवारीच्या स्वरुपात दिलेली असते. वार्षिके दिलेली माहिती विविध विषयांमधील असून, ती ताजी (प्रचलित) आणि प्रचलित असल्यामुळे संशोधनाच्या दृष्टीकोनातुन तिचा तुम्हांला हमखास उपयोग होऊ शकतो. वार्षिके ही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विशिष्ट विषय किंवा काही संघटनेच्या पातळीवर प्रसिध्द होत असतात. त्यांच्यातील माहितीची रचना त्यांच्यातील निर्देश यामुळे माहितीचा शोध घेणे सोपे जाते. वार्षिकाचा उपयोग, एखाद्या देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, कृषिविषयक दळणवळण, आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय संरक्षण, क्रिडा, लोकसंख्या, महत्त्वाच्या घडामोडी इत्यादी माहिती मिळते.

**निर्देशपुस्तके :—**

निर्देशपुस्तके हे एखाद्या विशिष्ट विषयातील सर्व प्रकारच्या बाबींची बारीकसारीक माहिती देणारे एक लहानसे पुस्तक असून त्याच्या नवीन घडामोडींऐवजी त्या विषयास सध्या उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा परामर्थ घेतलेला असतो. निर्देश पुस्तके हे सर्व विषयास असल्यामुळे त्यांचा उपयोग त्या त्या विषयातील तज्ञांना चांगल्याप्रमाणात होतो. संशोधनासाठी किंवा अभ्यासासाठी लागणारी माहिती त्यांना सूक्ष्म तपशिलासह निर्देश पुस्तकात मिळते. निर्देश पुस्तकातील माहिती संक्षिप्त स्वरुपात दिलेली असून ती विविध आकृत्या, आलेख, डेटा, समीकरणे, सुत्रे तत्वे, प्रतिके, तक्ते यांच्या स्वरुपात दिलेली असते.

**सांख्यिकी साधने :—**

सांख्यिकीय माहिती देणारी साधने ही शासनातर्फे किंवा अन्य संस्थामार्फत प्रकाशित केली जातात. ती विशेष प्रकारची असल्यामुळे त्यांच्यात मिळणारी माहिती ही विश्वसनीय समजली जाते. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकाकडून त्यांचा मोठ्य प्रमाणावर उपयोग केला जातो. उदा. भारतीय जनगणना अहवाल.

**स्थलवर्णन कोश :—**

भौगोलिक संशोधन करु इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी स्थलवर्णन कोश हा अत्यंत उपयोगी संदर्भसाधन आहे. स्थलवर्णन कोशात विशिष्ट भूप्रदेशातील स्थलाची संपूर्ण माहिती दिलेली असते. असा कोश जगातील संपूर्ण देश, एखादे राष्ट्र किंवा एखाद्या प्रदेशाचा असतो. त्याची रचना स्थलनामानुसार वर्णानुक्रमे केलेली असते.

प्रचलित असल्यामुळे संशोधनाच्या दृष्टीकोनातुन तिचा तुम्हांला हमखास उपयोग होऊ शकतो. वार्षिके ही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, विशिष्ट विषय किंवा काही संघटनेच्या पातळीवर प्रसिध्द होत असतात. त्यांच्यातील माहितीची रचना त्यांच्यातील निर्देश यामुळे माहितीचा शोध घेणे सोपे जाते. वार्षिकाचा उपयोग, एखाद्या देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, कृषिविषयक दळणवळण, आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय संरक्षण, क्रिडा, लोकसंख्या, महत्त्वाच्या घडामोडी इत्यादी माहिती मिळते.

**निर्देशपुस्तके :—**

निर्देशपुस्तके हे एखाद्या विशिष्ट विषयातील सर्व प्रकारच्या वार्तांची वर्गीकरणात्मक माहिती देणारे एक लहानसे पुस्तक असून त्याच्या नवीन घडामोडींविषयी त्या विषयास सध्या उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा परामर्श घेतलेला असतो. निर्देश पुस्तके हे सर्व विषयास असल्यामुळे त्यांचा उपयोग त्या त्या विषयातील तज्ञांना चांगल्याप्रमाणात होतो. संशोधनासाठी किंवा अभ्यासासाठी लागणारी माहिती त्यांना सूक्ष्म तपशिलासह निर्देश पुस्तकात मिळते. निर्देश पुस्तकातील माहिती संक्षिप्त स्वरुपात दिलेली असून ती विविध आकृत्या, आलेख, डेटा, समीकरणे, सुत्रे तत्वे, प्रतिके, तक्ते यांच्या स्वरुपात दिलेली असते.

**सांख्यिकी साधने :—**

सांख्यिकीय माहिती देणारी साधने ही शासनातर्फे किंवा अन्य संस्थामार्फत प्रकाशित केली जातात. ती विशेष प्रकारची असल्यामुळे त्यांच्यात मिळणारी माहिती ही विश्वसनीय समजली जाते. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संशोधकाकडून त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. उदा. भारतीय जनगणना अहवाल.

**स्थलवर्णन कोश :—**

भौगोलिक संशोधन करु इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी स्थलवर्णन कोश हा अत्यंत उपयोगी संदर्भसाधन आहे. स्थलवर्णन कोशात विशिष्ट भूप्रदेशातील स्थळाची संपूर्ण माहिती दिलेली असते. असा कोश जगातील संपूर्ण देश, एखादे राष्ट्र किंवा एखाद्या प्रदेशाचा असतो. त्याची रचना स्थलनामानुसार वर्णानुक्रमे केलेली असते.





स्थलवर्णन कोशात त्या त्या विशीष्ट भूप्रदेशातील शहरे, गावे, बेटे, पर्वत महासागर नद्या, सरोवर, धबधबे, इत्यादी स्थलनामांच्या अक्षांश रेखांशासहित अंतर्भाव केलेला असतो. याशिवाय भूप्रदेशातील इतिहास, प्राणी, वनस्पती, पिके, सणवार, उत्सव, वेशभूषा, हवामान, उद्योगधंदे, शैक्षणीक, राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, संख्या शास्त्रीय माहिती दिलेली असते. उदा : गॅझेटियर ऑफ इंडिया

**ग्रंथसूची :**

ग्रंथसूची ही प्रकाशित झालेल्या ग्रंथांची माहिती देणारी यादी आहे. या यादीच्या सहाय्याने संशोधकाला संशोधन विषयात कोणकोणते ग्रंथ प्रकाशित झाले आहेत याचा तपशिल मिळतो.

**निर्देश आणि सारसंग्रह :—**

जगामध्ये विविध क्षेत्रांत संशोधन चालू असते. ह्या संशोधनाची माहिती प्रथम संशोधन अहवाल शोधनिबंध, प्रबंध, प्रबंधिका यामध्ये उपलब्ध होते. त्यानंतर मात्र त्या त्या विषयातील किंवा महत्त्वाच्या नियत कालिकांत पहिल्यांदा प्रकाशित होते. ही माहिती पुस्तक किंवा ग्रंथात समाविष्ट होऊन प्रसिध्द होईपर्यंत कालबाहय होण्याचा धोका असतो, शिवाय ती खूप मोठ्या प्रमाणावर असते की नेमकी आपल्या विषयातील माहिती मिळविणे संशोधकाला कठीण होऊन बसते. यावर उपाय म्हणून अशा नियतकालिकात प्रकाशित झालेली ताजी व अध्ययावत अशी प्रचलित माहिती संशोधकाला त्वरित मिळावी म्हणून निर्देश व सारसंग्रह तयार केले जातात व संशोधकाला त्याच्या क्षेत्रातील अध्ययावत माहिती मिळते.

निर्देशात नियतकालीकांत आणि निवडक वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या लेखांची यादी केलेली असते. निर्देशात संकलित केलेला लेखांबरोबर त्या नियतकालिकांचे नाव, खंड वर्ष अंक, पृष्ठक्रमांक इत्यादी तपशील दिलेला असतो. त्यामुळे संशोधकाला उपयुक्त कोणकोणते लेख प्रकाशित झालेले आहेत हे कळते तसेच ते लेख कोणत्या नियतकालिकांत प्रकाशित झाले ते ही कळते. सारसंग्रहात प्रकाशित झाले ते ही कळते. लेखांचा सार दिला जातो त्यामुळे लेख उपयुक्त आहे की नाही हे संशोधकास समजते. लेख उपयुक्त असेल तर मुळ नियतकालीकांचा शोध घेण्याची आवश्यकता असते.

**सारांश :—**

संशोधकाला संशोधकासाठी प्रकाशित संदर्भग्रंथाचा उपयोग मोठया प्रमाणावर माहितीचा शोध घेण्यासाठी करण्यात येत आहे. संदर्भ ग्रंथातील माहितीचे स्वरुप, रचना, व्याप्ती, समाविष्ट बाबी हे संशोधकास ज्ञात असतीलच असे काही त्यामुळे ग्रंथपालाशी संपर्क साधून माहिती शोध घेणे शक्य होईल. संशोधनासाठी वेळ, पैसा इत्यादीची बचत होईल.

**संदर्भसूची :—**


१. जोशी अनंत (२००६), संशोधन मार्गदर्शक मालिका पुष्प पहिले, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२. नरगुंदे रेवती (२००५) प्रल्लेखन आणि माहितीशास्त्र, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन

३. पोखरापुरकर द.खं. (२००६), संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा उपयोग, नाशिक. यशवंतराव चव्हाण म. मुक्त विद्यापीठ.

४. साखरे राजेन्द्र रमाकांत (२००३) ग्रंथालय संदर्भसेवा : तात्विक व प्रात्यक्षिक पुणे युनिव्हर्सल प्रकाशन

५. शेख हारुण मोईनोद्दीन (१९९८) उच्च शिक्षणाद्वारे ज्ञाननिर्मिती व संशोधन, मैत्रीच्या पलीकडे


❑❑❑